# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१७

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### राज्य सहकारी बँकेला कोट्यवधी रुपयांचे झालेले नुकसान

**(१) ७४०४ (१८-०४-२०१५). श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य सहकारी बँकेच्या माध्यमातून संचालकांनी, सहकारी साखर कारखाने, सुत गिरण्या, प्रक्रिया उद्योगांना त्यांची आर्थिक क्षमता नसतांनाही कर्ज वाटप केल्याने ३० हजार करोड रुपयांचा गैरव्यवहार झाल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान शासनाने नियुक्ती केलेल्या चौकशी पथकाच्या निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शनाचे उल्लघन आणि पात्रतेपेक्षा अधिक कर्ज देऊन त्यांच्या वसूलीसाठी आवश्यक ते प्रयत्न न केल्याने झालेल्या सुमारे ४६०० कोटींच्या नुकसानीची जबाबदारी निश्चित करणारी नोटीस प्राधिकृत अधिकारी तथा अप्पर निबंधक यांनी महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेच्या तत्कालिन संचालक मंडळाला दिली, हे खरे आहे काय,

(३) राज्य सहकारी बँकेच्या ७५ माजी संचालकांना नियम ७२ (२) अन्वये कारणे दाखवा नोटिस केव्हा दिली असून त्यांची नावे काय आहेत तसेच कोणकोणत्या संचालकांनी किती रकमेचे आर्थिक नुकसान केले आहे,

(४) असल्यास, कलम ८३ अन्वये किती रकमेचे आर्थिक नुकसान कोणकोणत्या संचालकाने केले आहे,

(५) असल्यास, वरील सर्व प्रकरणांबाबत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार संबंधित दोषी संचालकावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच कर्ज वसुलीबाबत शासनाची भुमिका काय आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (३१-०१-२०१७) :**(१) होय, अंशत: खरे आहे. महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेने सहकारी साखर कारखाने, सुतगिरण्या, प्रक्रिया सहकारी संस्थांना परतफेडीची क्षमता नसताना कर्जवाटप केल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) होय, अंशत: खरे आहे. प्राधिकृत अधिकारी यांच्या दिनांक १०/९/२०१५ रोजीच्या महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चा नियम ७२(३) मध्ये दिलेल्या नोटिशीमध्ये बँकेचे रु.१०८६.५८ कोटींचे नुकसान झाल्याचे नमूद करण्यात आले आहे.

(३) प्राधिकृत अधिकारी यांनी दिनांक ३०/४/२०१५ रोजी महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चा नियम ७२ (२) अन्वये कारणे दाखवा नोटीस दिली आहे. त्याचप्रमाणे ७७ तत्कालीन संचालकांवर दिनांक १०/९/२०१५ रोजी नियम ७२(३) अन्वये अरोपपत्र ठेवले आहे.

(४) कायदा कलम ८३ च्या अहवालामध्ये संचालकनिहाय नुकसानीची माहिती नमूद करण्यात आलेली नाही.

(५) वरील प्रकरणी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अन्वये महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेस झालेल्या आर्थिक नुकसानीची जबाबदारी निश्चितीची कार्यवाही करण्यात येत आहे व सदरची चौकशी तथा कार्यवाही अद्याप सरु आहे. त्याचप्रमाणे सहकारी साखर कारखाने, सुतगिरण्या, प्रक्रिया संस्था इ. संस्थांना दिलेल्या कर्जाची वसुली बँकेमार्फत करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अन्नपूर्णा उपसा जलसिंचन संस्था मर्यादित भोजापूर (ता.रामटेक, जि.नागपूर) र.नं.१३५३ या संस्थेच्या कर्जमाफीबाबत**

**(२) ९५२७ (०९-०४-२०१५). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अन्नपूर्णा उपसा जलसिंचन संस्था मर्यादित भोजापूर (ता.रामटेक, जि.नागपूर) र.नं.१३५३ या संस्थेच्या कर्जमाफीबाबतचा रितसर प्रस्ताव जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांनी दिनांक २१ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास सचिव (सहकार), मंत्रालय, मुंबई यांचेकडे दाखल केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रस्तावावर शासनाने निर्णय घेतला आहे काय, त्यांचे स्वरूप काय आहे,

(३) अद्याप कोणताच निर्णय घेतला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व सदरहू प्रस्तावाबाबतची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. सुभाष देशमुख (३१-०१-२०१७) :**(१) हे अंशत: खरे आहे.

अन्नपूर्णा उपसा जलसिंचन संस्था मर्यादित भोजापूर (ता.रामटेक जि. नागपूर) या संस्थेच्या कर्जमाफिबाबतचा प्रस्ताव सहकार आयुक्त कार्यालयाकडून दिनांक ३/३/२०१५ रोजी शासनास सादर करण्यात आलेला आहे.

(२) व (३) अन्नपूर्णा उपसा जलसिंचन संस्था मार्यादित भोजापूर (ता.रामटेक जि. नागपूर) या संस्थेच्या कर्जमाफीबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

---

**राज्यातील टंचाई सदृश गावातील कृषीकर्जाचे पुनर्गठन करण्याबाबत**

**(३) ९५९० (०९-०४-२०१५). श्री.गणपतराव देशमुख (सांगोले) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील टंचाई सदृश्य २३ हजार ८११ गावामध्ये शेतक-यांनी घेतलेल्या पिक कर्जाच्या वसूलीस स्थगिती देवून त्याचे पुनर्गठन करण्याचा निर्णय शासनाने दिनांक २१ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू शेतकरी थकबाकीदार होत असल्याने त्यांना मिळत असलेल्या केंद्र व राज्य शासनाच्या व्याज सवलतीचा फायदा मिळत नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (३१-०१-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) उक्त २३८११ गावातील टंचाईसदृश्य परिस्थितीमुळे गत खरीप हंगामातील पीककर्ज वसुलीचे प्रमाण अल्प राहण्याची शक्यता असल्याने व वसुल न झालेल्या पीककर्जाचे मध्यम मुदत कर्जात रुपांतरण करण्याचा निर्णय शासनाने दि.२१/१/२०१५ च्या शासन निर्णयान्वये घेतला आहे. त्याचप्रमाणे शासन निर्णय दि.२९/७/२०१५ व २९/१२/२०१५ नुसार रुपांतरीत/पुनर्गठीत कर्जावरील प्रथम वर्षाचे संपूर्ण व्याज व पुढील चार वर्षाचे ६% दराने होणारे व्याज शेतकऱ्यांच्या वतीने शासनामार्फत बँकांना अदा करण्याचा निर्णय घेतला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील आपादग्रस्त शेतक-यांना कर्जासाठी ६ टक्के व्याजदर ठेवण्याबाबत**

**(४) १८३०५ (०६-०८-२०१५). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतक-यांच्या पिक कर्जाचे पुर्नगठन करण्याची तसेच आपादग्रस्त शेतक-यांना कर्जासाठी ६ टक्के व्याजदर ठेवण्याची घोषणा मा.महसूल मंत्र्यांनी दिनांक १२ मे, २०१५ रोजी औरंगाबाद येथील आढावा बैठकीत केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतक-यांच्या पिक कर्जाचे पुर्नगठन करण्यात आले आहे काय,
(३) असल्यास, शेतक-यांच्या पिक कर्जाचे पुर्नगठन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (३१-०१-२०१७) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) होय.
(३) ५० पेक्षा कमी पैसेवारी जाहीर केलेल्या गावांतील शेतकऱ्यांकडील पीक कर्जाचे त्यांच्या संमतीने ५ वर्षाचे कालावधीसाठी रुपांतरण करण्याचा निर्णय सहकार विभागाचे परिपत्रक दि. ११/०३/२०१६ अन्वये घेण्यात आला आहे. उक्त शासन परिपत्रकातील उपाययोजनेप्रमाणे क्षेत्रिय स्तरावर वसुलीस स्थगिती देण्यात येऊन बँकांनी माहे जुलै, २०१५ अखरेपर्यंत ५३३७४१ शेतकऱ्यांकडील रु. ३५०३ कोटी पीककर्जाचे पाच वर्ष कालावधीच्या मुदत कर्जामध्ये रुपांतरण केले आहे. तसेच सन २०१५-१६ या वर्षातील पुनर्गठीत पीक कर्जावरील सन २०१६-१७ या वर्षाचे संपूर्ण व्याज व पुढील चार वर्षाचे ६% दराने व्याज व सन २०१४ च्या खरीप हंगामातील पीककर्जाच्या पुनर्गठनाच्या पहिल्या हप्त्याच्या परतफेडीस मुदतवाढ देण्याचा निर्णय सहकार विभागाच्या शासन निर्णय दि. ९/०५/२०१६ अन्वये घेतलेला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मेहकर (जि.बुलढाणा) तालुक्यात फायन्सास कंपनीकडून शेतकऱ्यांचे होणारे आर्थिक नुकसान

**(५) १९७७० (१७-०८-२०१५). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मेहकर (जि.बुलढाणा) तालुक्यात फायन्सास कंपनीच्या वतीने ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात कर्ज पुरवठा करतांना शेतक-यांचे आर्थिक नुकसान होत असून शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत असल्याचे दिनांक १६ मे, २०१५ रोजी स्थानिक लोकप्रतिनिधींनी संबंधित अधिका-यांच्या निदर्शनास आणले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शेतक-यांची आर्थिक नुकसान करणा-या या फायन्सास कंपनीवर शासनामार्फत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (३१-०१-२०१७) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**खामगाव (जि.बुलढाणा) येथील शेतकऱ्यांना शेती कर्ज देण्यासाठी राष्ट्रीयकृत बँका कार्यपध्दती शुल्क आकारत असल्याबाबत**

**(६) २१६७९ (११-०८-२०१५). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगाव (जि.बुलढाणा) येथील शेतकऱ्यांना शेती कर्ज देण्यासाठी राष्ट्रीयकृत बँका कार्यपध्दती शुल्क आकारत असल्याबाबतच्या तक्रारी लोकप्रतिनिधींकडे तसेच शासनाकडे प्राप्त होत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शेतकऱ्यांना शेती कर्ज मिळण्याकरीता पहिले कार्यपध्दती शुल्क भरावी लागत असल्यामुळे शेतकऱ्यांच्या अडचणीमध्ये वाढ होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतकऱ्यांना शेती कर्ज देण्यासाठी संबंधितांना आदेश देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१३-०१-२०१७) :** (१) नाही. शासनाकडे वा क्षेत्रीय कार्यालयाकडे अशा तक्रारी प्राप्त नाहीत.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील शेतक-यांसाठी वार्षिक मुदतीचं पिक कर्ज वाटप करण्याबाबत**

**(७) २२२९१ (१४-०८-२०१५). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड), श्री.योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतक-यांसाठी १५ एप्रिलपासून वार्षिक मुदतीचं पिक कर्ज वाटप करण्यास सुरुवात होणार होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जळगांव जिल्हयात पिक संरक्षक सोसायट्या आणि जिल्हा बँकांच्या शाखेत पैसे शिल्लक नसल्याचे कारण सांगून पिक कर्जाचे पैसे मिळत नसल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, राष्ट्रीयकृत बँका जिल्हा बँकेच्या शाखांना पुरेसे पैसे देत नसल्याने शेतक-यांना पिककर्ज मिळण्यास उशीर होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (३१-०१-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, जिल्हा बँकेने मे, २०१५ अखेर रु. १०३९.४० कोटीचे कर्ज वाटप केलेले आहे. तथापि बँकेकडे निधी उपलब्ध असताना कॅशचा तुटवडा असल्याने काही शाखांमध्ये पीक कर्ज वाटपास विलंब झाला. ही अडचण स्टेट बँकेत रोकड कमी झाल्याने उद्भवली होती. परंतु तद्नंतर सभा आयोजित करुन रिझर्व्ह बँकेच्या मदतीने या अडचणीवर मात केली गेली आहे.

(३) बँकेकडे निधी उपलब्ध असताना राष्ट्रीयकृत बँकांकडून कॅशचा तुटवडा असल्याने मागणीप्रमाणे पुरेशी रोकड उपलब्ध होत नव्हती. तद्नंतर रिझर्व्ह बँकेच्या मदतीने यावर तोडगा काढल्यानंतर माहे सप्टेंबर, २०१६ अखेर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांमार्फत खरीप २०१६ मधील रु. १२५० कोटी उद्दिष्टापैकी रु. ९६४ कोटीचे पीक कर्ज वाटप करण्यात आले आहे.
(४) बँकेने सदर प्रकरणी आरबीआय नागपूर व जिल्हाधिकारी, जळगाव यांना पत्रव्यवहार करुन सदर बाब लक्षात आणुन दिल्यानंतर सर्व राष्ट्रीयकृत बँकांची मिटींग बोलावुन जिल्हा बँकेला कॅश पुरविण्याबाबत सुचना दिलेल्या होत्या.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**माण (जि.सातारा) तालुक्यातील विकास गटातील प्राथमिक अरोग्य केंद्रांना व्यावसायिक दराने वीज देयकांची आकारणी करण्यात येत असल्याबाबत**

**(८) २७०३९ (१७-०८-२०१५). श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) माण (जि.सातारा) तालुक्यातील विकास गटामध्ये सद्या ५ प्राथमिक आरोग्य केंद्र व ३२ उपकेंद्रामार्फत विविध प्रकारच्या वैद्यकीय सुविधा मोफत पुरविण्यात येतात या कार्यालयांना महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मार्फत वीज पुरवठा करण्यात येतो सदर चा वीज पुरवठा करते वेळी या कार्यालयांना व्यावसायिक दराने वीज देयंकाचे आकारणी करण्यात येत असल्याचे माहे जून, २०१५ मध्ये वा तया दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोणत्याही उत्पन्नाचे स्त्रोत नसलेल्या या शासकीय आरोग्य संस्थाना देण्यात येणारी वीज देयके घरगुती पध्दतीने करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (११-०१-२०१७) :**(१) हे खरे नाही.
महाराष्ट्र वीज नियामक आयोगाच्या आदेशानुसार सार्वजनिक प्रकारातील प्राथमिक आरोग्य केंद्र, जिल्हा परिषद शाळा इत्यादींना जे वीज दर निश्चित केले आहेत त्यानुसार माण तालुक्यातील ५ प्राथमिक आरोग्य केंद्रे व ३२ उपकेंद्रांना सार्वजनिक सेवा (Public Service LTX) दराने वीज देयक आकारण्यात येते.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे धोपावे-तेटले (ता. गुहागर) या गावांना रत्नागिरी गॅस आणि पॉवर कंपनीच्या जलवाहिनी टॅबमारुन पाणी देण्याबाबत**

**(९) २८४६५ (०८-०१-२०१६). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे धोपावे-तेटले (ता. गुहागर, जि. रत्नागिरी) या गावांना रत्नागिरी गॅस आणि पॉवर कंपनीच्या जलवाहिनी शिवाय पाण्याचा अन्य कोणताही पर्याय उपलब्ध नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जलवाहिनीला टॅबमारून पाणी देण्याबाबत मा. ऊर्जा मंत्री यांनी दिनांक १२ ऑगस्ट, २०१५ रोजी घेतलेल्या बैठकीत सदर प्रस्ताव शासनाकडे पाठविण्याचे आदेश जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांना दिले होते, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत काय ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२७-१२-२०१६) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) धोपावे-तेटले या गावाला पाणी साठवण टाकी व संबंधित पाईप लाईनची व्यवस्था करण्याबाबत महानिर्मिती कंपनीने संबंधितांस कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नागपूर येथील वीज कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांबाबत**

**(१०) ३१६१६ (०८-०१-२०१६). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथे हजारो वीज कर्मचाऱ्यांनी आपल्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी दिनांक १ सप्टेंबर, २०१५ रोजी पासून आंदोलन केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्न भाग (१) मधील प्रकरणी वीज कर्मचाऱ्यांनी केलेल्या मागण्यांचे थोडक्यात स्वरुप काय आहे व सदर मागण्यांवर आतापर्यंत शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२७-१२-२०१६) :** (१) कंत्राटी कर्मचा-यांच्या संयुक्त कृती समितीने मुंबई येथे धरणे आंदोलन केले होते.

(२) सदर कर्मचा-यांना कंपनीच्या सेवेत कायम करण्याची प्रमुख मागणी होती. सदर मागणीच्या अनुषंगाने कार्यकारी संचालक (मा.सं.), महानिर्मिती यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----

**अहमदाबाद येथील टोरेड पॉवर कंपनीच्या गैरव्यवहाराबाबत**

**(११) ३७८६० (२३-१२-२०१५). श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या उर्जा विभागाने अहमदाबाद येथील टोरेड पॉवर कंपनीला वीज पुरवठा करण्याचा ठेका दिलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील ९ वर्ष शहर परिसरातील वीज ग्राहकांना सदर कंपनी वीज पुरवठा करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दरम्यानच्या काळात सदर कंपनीचा गैरव्यवहार अनेक वेळा निदर्शनास आला असून या संदर्भात तेथील स्थानिक लोकप्रतिनिधींनी अनेकवेळा संबंधित विभागांना लेखी निवेदने/तक्रारी केलेल्या आहेत, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास चौकशीच्या अनुषंगाने केलेल्या तक्रारीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२५-०१-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) हे खरे आहे.

(४), (५) व (६) सदर तक्रारी महावितरण कंपनीकडे पाठविण्यात आल्या आहेत.

---

**हडी (ता.मालवण) येथे ५०० ग्राहकांना विज पुरवठ्यापासून वंचित रहावे लागल्याबाबत**

**(१२) ४००७८ (२०-०४-२०१६). श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हडी (ता. मालवण) येथे दीपावली दरम्यान ५०० ग्राहकाना विज पुरवठ्यापासून वंचित रहावे लागल्याचे माहे नोव्हेंबर २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, ऐन सणासुदीच्या काळात सर्व सामान्याना अंधारात रहावे लागले असल्याने या प्रकरणी संबधित दोषी असणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-०१-२०१७) :**(१) दिनांक ८.११.२०१५ रोजी दुपारी ४.२६ वाजता ३३/११ के.व्ही.कुंभारमाठ उपकेंद्रातील ११ के. व्ही. आचरा वीज वाहिनीवर हडी ग्रामपंचायतीमधील शेलटी या गावामध्ये झाडाची फांदी पडल्यामुळे पोल मोडून वीज वाहिन्या तुटल्या होत्या. पर्यायी मार्गाने वीज पुरवठा चालू करून देण्याचे काम त्याच रात्री १०.१५ वाजता पूर्ण करून वीज पुरवठा सुरळीत करण्यात आला.

(२) सदरची घटना झाडाची फांदी पडल्यामुळे पोल मोडून वीजवाहिन्या तुटल्याने घडलेली आहे. त्यामुळे कोणावरही कारवाई केलेली नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विदर्भ व मराठवाडा भागातील शेतकऱ्यांना कृषी पंपासाठी वीज दिली जात नसल्याबाबत**

**(१३) ४२१९५ (२०-०४-२०१६). श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात २ लाखांहून जास्त कृषी पंपाचा अनुशेष असून पैकी सर्वाधिक कृषी पंप विदर्भ व मराठवाडा भागातील असून महावितरणने या शेतकऱ्यांना वेळीच वीज दिली नसल्याने या भागात मोठया प्रमाणात शेतकऱ्याच्या आत्महत्या वाढत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२५-०१-२०१७) :** (१) हे खरे नाही.
मार्च, २०१५ अखेरीस राज्यात एकूण १,७३,८५२ इतके कृषी पंप पैसे भरुन प्रलंबित होते. त्यापैकी विदर्भात ६५७७२ कृषीपंप व मराठवाड्यात ३३२८२ कृषीपंप पैसे भरुन प्रलंबित होते.
(२) सदर प्रकरणी महावितरण कंपनीने चौकशी केली आहे.
(३) कृषीपंपाचा प्रादेशिक असमतोल दूर करण्यासाठी सन २०१५-१६ मध्ये विशेष पॅकेज योजनेंतर्गत सन २०१५-१६ मध्ये मार्च, २०१६ अखेर विदर्भात ६५९९७ व मराठवाड्यात ३५३३५ कृषीपंपाना वीजजोडण्या देण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**तिल्लोळी (ता.दिंडोरी, जि.नाशिक) येथे ज्ञान ज्योती आदिवासी मुलींच्या आश्रमशाळेत शिकत असलेल्या मुलींना कैद्यांप्रमाणे वागणूक दिली जात असल्याबाबत**

**(१४) ४५७५३ (२९-०४-२०१६). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.मधुकरराव चव्हाण (तुळजापूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सिध्दराम म्हेत्रे (अक्कलकोट), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तिल्लोळी (ता.दिंडोरी, जि.नाशिक) येथे ज्ञान ज्योती आदिवासी मुलींच्या आश्रमशाळेत शिकत असलेल्या मुलींना आश्रमशाळेतील व्यवस्थापनाकडून कैद्यांप्रमाणे वागणूक दिली जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त आश्रमशाळेची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे,
(३) असल्यास, चौकशी अहवालानुसार शासनाने संबंधीतांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०७-०३-२०१७) :**(१) हे खरे नाही.
(२) व (३) दिनांक १.२.२०१६ रोजी प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, नाशिक यांनी गठीत केलेली चौकशी समितीने सदर शाळेस भेट देऊन चौकशी केली आहे.

विद्यार्थीनीना कैद्यांप्रमाणे वागणूक दिली जात नाही, आश्रमशाळेसाठी स्वतंत्र इमारत असून वसतिगृहाची व्यवस्था आहे, विद्यार्थीनींना आवश्यक साहित्य उपलब्ध करुन देण्यात आले आहे, पिण्याच्या पाण्याची पुरेशी व्यवस्था आहे, जेवणाचा दर्जा चांगला असून विद्यार्थीनींची शैक्षणिक प्रगती समाधानकारक असल्याचे चौकशीत आढळून आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**डहाणू प्रकल्पांतर्गत येणाऱ्या पालघर येथील शासकीय मुलींच्या वसतीगृहात कु. तेजस्वी मधुकर खात्रे या आदिवासी विद्यार्थ्यानीला इयत्ता ११ वी मध्ये प्रवेश मिळण्याबाबत**

**(१५) ४६३६० (२९-०४-२०१६). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कु. तेजस्वी मधुकर खात्रे या आदिवासी विद्यार्थ्यानीने डहाणू प्रकल्पांतर्गत येणाऱ्या पालघर येथील शासकीय मुलींच्या वसतीगृहात इयत्ता ११ वी मध्ये प्रवेश मिळण्यासाठी मा. आदिवासी विकास मंत्री महोदयांकडे माहे जानेवारी, २०१६ मध्ये निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त विद्यार्थ्यानीना त्या शासकीय वसतीगृहात प्रवेश न देता तिच्यापेक्षा कमी मार्क असलेल्या विद्यार्थ्यानींला वसतीगृहात प्रवेश दिला असल्याचे उघडकीस आले, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने प्रश्न भाग १ व ३ नुसार वसतीगृहात प्रवेश मिळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे तसेच संबंधीत अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली आहे वा येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१०-०१-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) नाही. हे खरे नाही.

(३) व (४) प्रकरणी आदिवासी मुलींचे वसतीगृह पालघर येथे मंजूर क्षमतेनुसार व गुणवत्तेनुसार विद्यार्थीनींना प्रवेश देण्यात आलेला आहे. प्रत्येक वर्षी रिक्त होणा-या जागेच्या १० टक्के प्रवेश खास बाब अंतर्गत शासनस्तरावरुन मान्यता दिलेल्या विद्यार्थ्यांच्या यादीमधून गुणानुक्रमाने दिला जातो.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बीजूधावडी (ता.धारणी, जि.अमरावती) या शासकीय आश्रमशाळा व कनिष्ठ महाविद्यालयात तसेच सुसर्दा येथील प्रयोगशाळा इमारतीचे बांधकामाबाबत**

**(१६) ४७०४० (२९-०४-२०१६). श्री.डी.एस.अहिरे (साक्री), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीजूधावडी (ता.धारणी, जि.अमरावती) या शासकीय आश्रमशाळा व कनिष्ठ महाविद्यालयात तसेच सुसर्दा येथील आश्रमशाळेत विज्ञानशाखा असूनही प्रयोगशाळा इमारतीचे बांधकाम अद्याप पूर्ण झालेले नाही त्यामुळे बारावी विज्ञानशाखेच्या विद्यार्थ्यांना अद्याप प्रयोगच करायला मिळाले नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चिखलदरा तालुक्यात डोमा येथील आश्रमशाळेत अकरावी बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी गणित शिक्षकच नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रश्न १ नुसार सदर ठिकाणी प्रयोगशाळेच्या इमारतीचे काम पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, उक्त प्रश्न २ नुसार येथील आश्रमशाळेत गणित शिक्षक नियुक्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१०-०२-२०१७)** :(१), (२), (३) व (४) प्रकल्प कार्यालय धारणी येथील शासकीय आश्रमशाळा, बिजुधावडी व सुसर्दा ता.धारणी येथे राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियानाअंतर्गत इयत्ता ९ वी व १० वी करिता एक प्रयोग शाळेचे बांधकाम अंतिम टप्प्यात आहे.

तसेच शाळेतील इयत्ता ९ वी ते १२ वीच्या विद्यार्थ्यांची विज्ञान प्रात्यक्षिकाबाबत गैरसोय व त्यांचे शैक्षणिक नुकसान होवू नये म्हणून आश्रमशाळेतील एक वेगळ्या खोलीचा उपयोग प्रयोगशाळेकरिता करण्यात आला असून विद्यार्थ्यांचे प्रयोग नियमित घेण्यात आलेले आहेत.

शासकीय आश्रमशाळा डोमा ता. चिखलदरा येथे गणित शिक्षकाचे पद भरण्यात आलेले आहे. परंतु या पदावरील शिक्षकास तात्पुरत्या स्वरुपात अपर आयुक्त, आदिवासी विकास, अमरावती येथे सहायक प्रकल्प अधिकारी (शिक्षण) या पादावर प्रतिनियुक्ती करण्यात आली

होती. तथापि सद्यस्थितीत त्यांना प्रतिनियुक्तीवरुन मुळ ठिकाणी अध्यापनासाठी पदस्थापना देण्यात आली आहे. त्यांच्या प्रतिनियुक्तीच्या कालावधीत इयत्ता ८ वी ते १० पर्यंत शिकवत असलेल्या शिक्षकाने इयत्ता ११ वी व १२ वीच्या वर्गाच्या गणित विषयाचे अध्यापन केलेले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सांगली जिल्ह्यातील कृषीपंपाचे व घरगुती, वाणिज्य व औद्योगिक वापरातील ग्राहकांचे वीज जोडणीचे प्रकरणे प्रलंबित असल्याबाबत**

**(१७) ४८५३८ (२०-०४-२०१६). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गेल्या ४ वर्षात सांगली जिल्ह्यातील कृषीपंपाचे सुमारे १३ हजार ५८४ आणि घरगुती, वाणिज्य व औद्योगिक वापराचे सुमारे १० हजार ७६९ ग्राहकांचे वीज जोडणीचे प्रकरणे प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एवढया मोठया प्रमाणावर प्रकरणे प्रलंबित रहाण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-०१-२०१७) :** (१) होय, हे अंशत खरे आहे. एप्रिल २०१६ अखेर सांगली जिल्ह्यामध्ये १२७५२ कृषीपंप पैसे भरुन वीज जोडणीकरीता प्रलंबित आहेत आणि घरगुती, वाणिज्य व औद्योगिक वापराची ९,३७५ नविन वीज जोडणी प्रकरणे प्रलंबित आहेत.

(२) सांगली जिल्ह्यामध्ये मार्च, २०१५ अखेर ११३०७ कृषीपंप पैसे भरुन प्रलंबित होते. सन २०१५-१६ मध्ये ४३७२ कृषीपंपाचे ऊर्जीकरण करण्यात आले असून मार्च, २०१६ अखेर १२१३१ कृषीपंपपैसे भरुन वीज जोडणीकरीता प्रलंबित आहेत. तसेच घरगुती, वाणिज्य व औद्योगिक असे एकूण ८७६३ ग्राहक मार्च, २०१५ अखेर पैसे भरुन वीज जोडणीकरीता प्रलंबित होते. सन २०१५-१६ मध्ये २६८०३ घरगुती, वाणिज्य व औद्योगिक असे एकूण ९४९९ ग्राहक पैसे भरुन वीज जोडणीकरीता प्रलंबित आहेत.

(३) होय.

(४) सांगली जिल्ह्यामध्ये पायाभूत आराखडा-२ योजनेअंतर्गत ३७३० कृषीपंपाची तरतूद होती. त्यापैकी सन २०१५-१६ मध्ये ३६७२ कृषीपंपाचे ऊर्जीकरण करण्यात आले असून उर्वरित ५८ कृषीपंपाचे ऊर्जीकरण जून २०१६ अखेर पूर्ण करुन उद्दिष्ट पूर्ण करण्यात आले.

डीपीडीसी योजनेअंतर्गत सांगली जिल्ह्याला रु.४ कोटींचा निधी देण्यात आला असून रु. २ कोटींचा निधी घरगुती ग्राहकांच्या वीजजोडणीचा पायाभूत सुविधांसह समावेश आहे.

उर्वरित महाराष्ट्राकरीता सन २०१६-१७ मध्ये येणा-या संभाव्य कृषीपंपांना वीजजोडणी देण्याच्या उद्देशाने रु.१६५५.७४ कोटींची योजना प्रस्तावित असून त्यात सांगली जिल्ह्यासाठी २७,४३८ कृषीपंपाकरीता रु.२६६.३३ कोटी इतक्या निधीचा समावेश आहे.

सन २०१६-१७ मध्ये ३० जून, २०१६ अखेर ८७६ कृषीपंपाचे ऊर्जीकरण करण्यात आले असून ५७१७ घरगुती, वाणिज्य व औद्योगिक वीजजोडण्या देण्यात आल्या आहेत व उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आदिवासी समाजातील महिलांना जातीचा दाखला मिळण्यास येत असलेल्या अडचणी दूर करण्याबाबत**

**(१८) ४९४५१ (२९-०४-२०१६). श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी संवर्गातील नागरीकांना जातीचा दाखला देताना मुलगा किंवा मुलगी (Son of / Daughter of ...) असा दाखला दिला जातो, परंतु महिलांच्या बाबतीत यांची पत्नी (Wife) असा दाखला दिला जात नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विवाहीत महिला कितीही वयस्कर असली तरी तिच्या वडिलांच्या जातीचा दाखला द्यावा लागतो, सासरकडची इतर सर्व कागदपत्रे पतीच्या नावाने असुनही जातीच्या दाखल्यासंदर्भात पुरावा असुन पतीच्या नावाचा समावेश असूनही जातीचा दाखला विवाहीत महिलांना मिळण्यास अडचणी येत असून काही प्रसंगी जातीचा दाखल मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग १ व २ विचारात घेता आदिवासी समाजातील महिलांना जातीचा दाखला मिळण्यास येत असलेल्या अडचणी दूर करण्याबाबत शासन आवश्यक कार्यवाही करणार वा करीत आहे काय,

(४) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१०-०१-२०१७) :** (१) होय. महाराष्ट्र अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम, २००३ नुसार विहित केलेल्या नमुन्यामध्ये अनुसूचित जमाती जात प्रमाणपत्र निर्गमित करण्यात येते.

(२) व (३) शासनाने “महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग जातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० (२००१ चा महा.क्र.२३), व त्याअंतर्गत महाराष्ट्र अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम, २००३, “ लागू केलेले आहेत. सदर नियम २००३ मधील नियम ३ (३), ३ (४) नुसार नमुद केलेली कागदपत्रे व पुरावे सादर करणा-या व्यक्तीस अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र मिळते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील हलबा जातीच्या संबंधीची प्रकरणे न्यायालयात प्रलंबित असल्याबाबत**

**(१९) ५०३८० (२८-०४-२०१६). श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील हलबा जातीच्या संबंधाने ते अनुसूचित जमातीच्या संबंधीची प्रकरणे उच्च न्यायालयात प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, काही प्रकरणांमध्ये राज्य शासनाविरुध्द उच्च न्यायालयाने निर्णय दिले आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, अशा निर्णयाविरुध्द राज्य शासनाने सर्वोच्च न्यायालयात अपील दाखल केले असून त्या अपीलांमध्ये सुध्दा सर्वोच्च न्यायालयाने राज्य शासनाच्या विरुध्द निर्णय दिला आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, न्यायालयाच्या निर्णयानुसान शासन काय कार्यवाही करणार आहे ?

**श्री. विष्णु सवरा (१०-०१-२०१७) :**(१) होय.

(२) होय.

(३) व (४) शासनाने सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुज्ञा याचिका दाखल केल्या असून सदर याचिका न्यायालयात प्रलंबित आहेत.

---

**विदर्भात विज प्रकल्प असूनही येथील शेतकऱ्यांना लोड शेडिंगला सामोरे जावे लागत असल्याबाबत**

**(२०) ५०३९१ (२०-०४-२०१६). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भात विज प्रकल्प असूनही येथील शेतकऱ्यांना लोड शेडिंगला सामोरे जावे लागत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कृषीपंपासाठी शेतकऱ्यांना सबसिडी मिळत असूनही सर्वात कमी सबसिडी विदर्भासाठी ४.२८ इतकीच मिळत असल्याचे पुन्हा एकदा निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास,चौकशीच्या अनुषंगाने सबसिडी देण्याबाबत व लोडशेडिंग उठविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२५-०१-२०१७) :** (१) हे खरे नाही.

राज्यामध्ये येणारे नविन वीजनिर्मिती प्रकल्प हे इंधन, जागा, पाणी इत्यादी बाबींची उपलब्धता विचारात घेऊन उभारण्यात येतात. राज्यातील पाण्याचे योग्य ते नियोजन

करण्यासाठी तसेच शेतक-यांना कृषीपंपांसाठी आवश्यक असलेल्या विद्युत पुरवठा लक्षात घेऊन शासनाच्या प्रचलित धोरणानुसार व महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या आदेशानुसार, मागणी व्यवस्थापन योजनेअंतर्गत सिंगल फेजींग व कृषीपंप विलगीकरण वाहिन्यांवरील ५०% कृषी ग्राहकांना रात्रीच्या काळात १० तास व उर्वरित ५०% कृषी ग्राहकांना दिवसा ८ तास वीजेची उपलब्धता चक्राकार पध्दतीने देण्यात येते. दिवसा व रात्री देण्यात येणारी वीजेची उपलब्धता स्थानिक कृषी ग्राहकांच्या सोईनुसार आठवड्यातून दोन वेळेस किंवा प्रत्येक आठवड्यास चक्राकार पध्दतीने देण्यात येते.

(२) हे खरे नाही.

कृषी पंप ग्राहकांना अनुदान/सबसिडी ही विभागानुसार देण्यात येत नाही. कृषी पंप वीज मिटर ग्राहकांना त्यांच्या वीज वापरानुसार सबसिडी देण्यात येते. तसेच ज्या कृषी पंप ग्राहकांना वीज मिटर बसवलेले नाहीत अशा कृषी पंप ग्राहकांना त्यांच्या अश्वशक्तीनुसार सबसिडी देण्यात येते.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**माळेगाव (जि.नांदेड) येथील धनगर समाजाला अनुसूचित जमाती प्रवर्गातील आरक्षण देण्याबाबत**

**(२१) ५११२० (२०-०५-२०१६). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माळेगाव (जि.नांदेड) येथे धनगर समाजाच्या महामेळाव्यात राज्यातील धनगर समाजातील तांत्रिक त्रुटीची दुरुस्ती करून, संविधानाच्या चौकटीत राहून अनुसूचित जमाती प्रवर्गाचे आरक्षण देण्याची घोषणा मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिनांक ११ जानेवारी, २०१६ रोजी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आरक्षणातील तांत्रिक त्रुटीची दुरुस्ती करण्यात आली आहे काय तसेच सदर आरक्षण देण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) सदर आरक्षण लागू करण्यास शासनास किती कालावधी लागेल ?

**श्री. विष्णु सवरा (०२-०३-२०१७) :** (१), (२) व (३) धनगर किंवा धनगड एक आहेत किंवा कसे याबाबत संशोधन करुन अहवाल सादर करण्याबाबत टाटा इन्स्टिट्युट ऑफ सोशल सायन्सेस, मुंबई यांना कळविण्यात आले आहे. त्यानुसार संस्थेकडून सदर संशोधन तीन टप्प्यात करण्यात येणार आहे. त्यापैकी संशोधनाच्या पहिल्या टप्प्यांतर्गत (Formative Research) चे काम पुर्ण झाले आहे. उर्वरित टप्प्यातील मुख्य संशोधनाचे भाग-१ व भाग-२ मधील संशोधनाचे काम पुर्ण करुन अंतीम अहवाल माहे डिसेंबर, २०१७ पर्यंत सादर करण्यात येईल, असे टाटा इन्स्टिट्युट ऑफ सोशल सायन्सेस, मुंबई यांनी शासनास कळविले आहे. तदनुसार संस्थेचा अंतीम अहवाल शासनास प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही अपेक्षित आहे.

---

## आदिवासी व जंगलातील अन्य समुहांना जंगलावर अधिकार देण्याऱ्या वन अधिकार कायद्याच्या अंमलबजावणीस दिलेली स्थगिती

**(२२) ५३६३१ (१२-०८-२०१६). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी व जंगलातील अन्य समूहांना जंगल जमिनीवर आणि जंगलावर अधिकार देणाऱ्या कायद्याची अंमलबजावणी होण्याअगोदरच सदर कायद्याच्या अंमलबजावणीस दिनांक ३१ डिसेंबर, २०१५ रोजी पासून पूर्णविराम देवून तसे आदेश आदिवासी आयुक्तांकडून सर्व जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कायद्याची अंमलबजावणी पूर्ण झाल्याची घोषणा केवळ ग्राम सभाच करु शकत असतांना व तसे आदेश व मार्गदर्शक सूचना वेळोवेळी केंद्र शासनाने दिलेल्या असतानाही त्या डावलून असा अनधिकृतपणे निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाराष्ट्रात जेमतेम ९ वर्षा पूर्वी अस्तित्वात आलेल्या वन अधिकार कायद्याची अंमलबजावणी यथा-तथाच झालेली असून, महाराष्ट्रातील अंमलबजावणीबाबत केंद्रीय आदिवासी विभागाने सक्त नाराजी व्यक्त केली आहे हे खरे आहे काय.

(४) असल्यास, कायद्याची अंमलबजावणी पूर्ण होण्या अगोदरच कायद्याच्या अंमलबजावणीला पूर्ण विराम देण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१७-०१-२०१७) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रायगड जिल्ह्यातील घरकुल योजनेचा निधी अखर्चित राहिल्याबाबत

**(२३) ५५२५० (२०-०८-२०१६). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील दारिद्रयरेषेखालील मागासवर्गीय समाजासाठी घरे बांधण्यासाठी घरकुल योजनेंतर्गत सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात निधी पुरविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या घरकुल योजनेंतर्गत अनुसूचित जाती (एस.टी)साठी आलेल्या निधीतून घरकुलाची पूर्णतः मंजूरी होवूनही अखर्चीत राहिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अखर्चीत राहिलेला निधी अन्य दारिद्रयरेषेखालील मागासवर्गीय समाजातील नागरिकांसाठी घरकुल बांधण्यासाठी समाविष्ट करण्यात येईल काय,

(४) असल्यास, यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, घरकुलांचा निधी अखर्चित राहिल्याने शासनाने संबंधितांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१४-०२-२०१७)** : (१) रायगड जिल्ह्यासाठी सन २०१५-१६ करीता शबरी आदिवासी घरकुल, पारधी विकास कार्यक्रमांतर्गत घरकुल योजना व आदिम जमाती घरकुल योजनेकरीता अनुक्रमे लक्षांक २०६, २ व १५६ प्राप्त आहे.

सन २०१५-१६ पासून सदर घरकुलांचा निधी राज्य व्यवस्थापन कक्ष गृहनिर्माण, बेलापूर, मुंबई यांचे कडे वर्ग केला असून जिल्हास्तर लाभार्थी मंजुरीची प्रक्रीया सुरु आहे.

(२) अपर आयुक्त, आदिवासी विकास ठाणे अंतर्गत प्रकल्प अधिकारी पेण यांनी त्यांचे पत्रक क्र. जा. क्र. घरकुल-२०१६/का-३/३४९९, दि.२२/७/२०१६ अन्वये रायगड जिल्ह्यातील सर्व पंचायत समिती कार्यालयांना सन २०१५-१६ करीता लाभार्थ्यांच्या घरकुलांचे सर्वेक्षण करुन गावनिहाय लाभार्थी यादी सादर करणेबाबत कळविले आहे.

(३) आदिवासी विभागामार्फत राबविण्यात येणारी घरकुल योजना ही अनुसूचित जमाती साठीच असल्याने सदर घरकुलाचा निधी बिगर आदिवासी समाजासाठी खर्च करता येणार नाही.

(४) अशा प्रकारचे निवेदन आदिवासी विकास विभागाकडे प्राप्त झालेले नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अनुसूचित जमातीच्या शिक्षकांना अनुसूचित क्षेत्रात शिकविण्यास प्रोत्साहन देण्याबाबत**

**(२४) ५६९१३ (१२-०८-२०१६). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बिगर आदिवासी भागातील अनुसूचित जमातीच्या शिक्षकांना अनुसूचित क्षेत्रात बदलीवर जाण्याकरिता दि.२४.५.२०१६ रोजी वा त्या सुमारास नाशिक येथे समुपदेशन करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या समुपदेशनामध्ये किती शिक्षक आदिवासी भागात जाण्यास तयार झाले आहेत,

(३) असल्यास, अनुसूचित जमातीच्या शिक्षकांना अनुसूचित क्षेत्रात शिकविण्यास प्रोत्साहन देण्याकरिता शासन कोणत्या विशेष सवलती देणार आहे काय?

**श्री. विष्णु सवरा (०७-०२-२०१७)** :(१), (२) व (३) बिगर आदिवासी भागातील अनुसूचित जमातीच्या शिक्षकांना अनुसूचित क्षेत्रात बदलीवर जाण्याकरीता दि.२४.५.२०१६ रोजी वा त्या सुमारास समुपदेशन करण्यात आलेले नाही.

सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षात बदल्या करतांना शिक्षकांकडून आदिवासी भागात काम करण्यास तयार असल्याबाबत विकल्प मागविण्यात आले होते. त्यानुसार १७ माध्यमिक शिक्षक व ३७ प्राथमिक शिक्षकांना अनुसूचित क्षेत्रात पदस्थापना देण्यात आली आहे.

सामान्य प्रशासन विभागाच्या अधिसूचनेनुसार शासन निर्णय दि.५ मार्च, २०१५ अन्वये जाहीर केल्या नुसार अनुसूचित क्षेत्रातील १२ संवर्गाची पदे स्थानिक अनुसूचित जमातीतील उमेदवारांमधून भरावयाची आहेत. सदर पदांमध्ये शिक्षक संवर्गाचा समावेश आहे.

---

**आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पूणे यांनी जातीय द्वेषातून शासनाची दिशाभूल करणारा अहवाल शासनास सादर केल्याबाबत**

**(२५) ५७७४८ (१२-०८-२०१६). श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पूणे यांनी अनुसूचित जमाती प्रमाणपत्र समिती, औरंगाबाद यांच्या दिनांक ६ सप्टेंबर, २०१० ते दिनांक ५ ऑक्टोबर, २०११ या कालावधीत निकाली काढलेल्या जात वैधता प्रमाणपत्र प्रकरणांची चौकशी करुन दिनांक ८ मार्च, २०१६ रोजी शासनास अहवाल सादर केलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अहवाल जातीय द्वेष वाढवून शासनाची दिशाभूल करणारा असून त्यांच्यावर कारवाई करण्याची मागणी माजी आमदार श्री.अनंत तरे यांनी दिनांक १५ मे, २०१६ रोजी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरच्या अहवालावर शासनाने कोणता निर्णय घेतलेला आहे तसेच सदर तक्रारीवरुन कोणती काय कार्यवाही केली आहे वा करणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१३-१२-२०१६) :** (१) होय.

(२) होय.

(३) दि.०६.०९.२०१० ते दि.०५.१०.२०११ या कालावधीत निर्गमित करण्यात आलेल्या अनुसूचित जमातीच्या वैधता प्रमाणपत्रांच्या प्रकरणांचे पुनर्विलोकन करण्यासाठी मा.उच्च न्यायालयामध्ये विशेष याचिका दाखल करण्याची कार्यवाही करण्याबाबत आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांना दि.२७.०६.२०१६ च्या शासन पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर जिल्हयातील अनुसूचित जमातीच्या तीन हजारांवर शासकीय कर्मचाऱ्यांची जातपडताळणीची प्रकरणे प्रलंबित असल्याबाबत**

**(२६) ५७९०२ (१२-०८-२०१६). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हयातील अनुसूचित जमातीच्या तीन हजारांवर शासकीय कर्मचाऱ्यांची जातपडताळणीची अनेक प्रकरणे मागील दोन वर्षापासून प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासकीय कर्मचाऱ्यांची जात पडताळणी संदर्भातील प्रकरणे नियमानुसार सहा महिन्यांच्या आत निकाली काढणे आवश्यक असतांना अद्यापपर्यंत ती निकाली काढण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या जात पडताळणीची प्रकरणे निकाली काढण्यास विलंब करणाऱ्या शासकीय अधिकाऱ्यांच्या कामाची चौकशी करुन त्यांच्यावर कारवाई करण्यात येणार आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (२८-१२-२०१६) :** (१) दि.२२.०८.२०१६ अखेर नागपूर जिल्ह्यातील सेवा प्रकारांतर्गत शासकीय कर्मचा-यांची ९९१ जात पडताळणीची प्रकरणे समितीकडे प्रलंबित आहेत. त्यापैकी ६९८ प्रकरणे गृह व शालेय चौकशीसाठी पोलीस दक्षता पथकाकडे प्रलंबित आहेत.
(२), (३) व (४) समितीकडील प्राप्त अर्जाची संख्या, अर्जदाराने सादर केलेल्या कागदपत्रांची चौकशी करण्यासाठी पोलीस दक्षता पथकास लागणारा कालावधी व त्यामुळे समितीस अहवाल सादर करण्यास लागणारा वेळ, समिती व दक्षता पथकामधील रिक्त पदे, समितीच्या निर्णयाबाबत अर्जदाराने केलेल्या न्यायालयीन प्रकरणे इत्यादी बाबींमुळे जात पडताळणीची प्रकरणे निकाली काढण्यास अधिक कालावधी लागत आहे. तद्नुषंगाने रिक्त पदे भरणे, समितीच्या कामकाजाचा आढावा घेऊन प्रकरणे निकाली काढण्याबाबत संबंधितांना सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच जात वैधता प्रमाणपत्राची पध्दती पुर्णत: ऑनलाईन करण्याची कार्यवाही करण्यात आली आहे.

---

**नागपूर रामटेक क्षेत्रातील आदिवासी विभागाअंतर्गत तलावाच्या दुरुस्तीच्या प्रस्तावाबाबत**

**(२७) ५८९१२ (२४-०८-२०१६). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर रामटेक विधानसभा क्षेत्रातील आदिवासी विभागाअंतर्गत ६.३९ कोटी रुपये तलावाच्या दुरुस्तीचा प्रस्ताव माहे फेब्रुवारी, २०१६ पासून शासनाकडे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त विषयाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०७-०३-२०१७) :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे,
माहे डिसेंबर, २०१५ मध्ये स्थानिक लोकप्रतिनिधींनी रामटेक (जि.नागपूर) येथील तलावांच्या दुरुस्तीसाठी रु.६.३९ कोटीची मागणी केली होती. परंतू सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात माहे डिसेंबर, २०१५ अखेर लघु पाटबंधारे तलावांच्या कामांसाठी आदिवासी विकास विभागाकडे उपलब्ध असलेला अल्प निधी व त्यावेळी प्रलंबित असलेल्या कामांचे दायित्व विचारात घेता, सदर मागणी त्या आर्थिक वर्षामध्ये मान्य करता आली नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे देवलापार (ता.रामटेक, जि.नागपूर) येथे इंग्रजी माध्यमाची K.J. to P.J. शाळा सुरु करणेबाबत**

**(२८) ५९१०४ (२२-०८-२०१६). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे देवलापार (ता.रामटेक, जि.नागपूर) येथे इंग्रजी माध्यमाची K.J. to P.J. शाळा सुरु करण्याचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान मा.आदिवासी विकास मंत्री यांना दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासी विद्यार्थ्यांना उच्च प्रतिचे इंग्रजी माध्यमाचे शिक्षण याच वर्षापासून मिळण्यासाठी शासन स्तरावर कोणती उपाययोजना करण्यात आली वा येत आहे,

(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०७-०३-२०१७) :**(१) हे खरे आहे.

(२) व (३) देवलापार येथील स्थानिक लोकसंख्या ४९०० असून त्यातील आदिवासी लोकसंख्या ३० टक्के एवढी आहे. देवलापार येथे १ ली ते १२ वी पर्यंत आदिवासी अनुदानित आश्रमशाळा असून जिल्हा परिषदेच्या तसेच मराठी माध्यमाच्या खाजगी शाळाही आहेत. देवलापार येथून २५ कि.मी. वर असलेल्या रामटेक येथे या विभागाची इंग्रजी माध्यमाची एकलव्य पब्लिक स्कुल ही इयत्ता ६ ते १२ वी पर्यंत निवासी शाळा आहे.

मौजे देवलापार येथे इंग्रजी माध्यमाची K.G. to P.G. शाळा सुरु करण्याबाबत सविस्तर अहवाल आयुक्त, आदिवासी विकास, नागपूर यांचेकडून मागविण्यात आला आहे. अहवाल प्राप्त झाल्यावर या बाबत धोरणात्मक निर्णय घेण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्याच्या ऊर्जा मंत्रालयाकडून वीज कंपन्यांचे तुकडे करुन प्रादेशिक कंपन्या स्थापन करण्याबाबत**

**(२९) ५९६५५ (१०-०८-२०१६). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातच्या ऊर्जा मंत्रालयाकडून वीज कंपन्यांचे तुकडे करुन प्रादेशिक कंपन्या स्थापन करण्याचा शासनाचा मानस असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या विरोधात महावितरण महानिर्मिती, महापारेषण या तीन्ही कंपन्यांमधील अधिकारी व कामगार संघटनांनी या मागणीसह ७ जूनला राज्यव्यापी संप करण्याची घोषणा केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्या अनुषंगाने याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२४-०१-२०१७) :** (१) हे खरे नाही.
(२) तिन्ही कंपन्यांतील कार्यरत संघटनांच्या संयुक्त कृती समितीने विविध प्रश्नांबाबत/मागण्यांबाबत दि. ०७ जून, २०१६ रोजी संप करण्याबाबतची नोटीस दिली होती.
(३) व (४) वीज कंपन्यांचे विभाजन करुन प्रादेशिक कंपन्यां स्थापन करण्याचा कोणताही प्रस्ताव नाही. परंतु, ग्राहकांना चांगल्या प्रकारे सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी महावितरणे कंपनीअंतर्गत चार प्रादेशिक कार्यालयांची निर्मिती करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चिमूर (जि.चंद्रपूर) येथील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाच्या कार्यक्षेत्राअंतर्गत येत असलेल्या चार अनुदानित आश्रमशाळांची कायमस्वरुपी मान्यता रद्द केल्याबाबत**

**(३०) ६२७६५ (१२-०८-२०१६). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चिमूर (जि.चंद्रपूर) येथील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाच्या कार्यक्षेत्राअंतर्गत येत असलेल्या चार अनुदानित आश्रमशाळांची कायमस्वरुपी मान्यता आयुक्तांनी माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान रद्द केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या आश्रमशाळांची मान्यता रद्द करण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, यासंदर्भात पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. विष्णु सवरा (०७-०३-२०१७) :** (१) हे खरे आहे.
(२) आश्रमशाळांतील अपुऱ्या सोयीसुविधा व अत्यल्प विद्यार्थी पटसंख्या यामुळे या शाळांची मान्यता रद्द करण्यात आली आहे.
(३) एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, चिमूर, जि.चंद्रपूर कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील चारही अनुदानित आश्रमशाळेतील विद्यार्थी तसेच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे अन्य आश्रमशाळांमध्ये समायोजन करण्यात आले आहे.

---

**सह आयुक्त, जात पडताळणी समिती, नंदूरबार यांनी जात प्रमाणपत्र देण्याच्या कामामध्ये कोट्यावधी रुपयांचा झालेला गैरव्यवहार**

**(३१) ६२९५० (१२-०८-२०१६). श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सह आयुक्त, जात पडताळणी समिती, नंदूरबार यांनी जात प्रमाणपत्र देण्याच्या कामामध्ये कोट्यावधी रुपयांचा गैरव्यवहार केल्याचे माहे मे, २०१६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे,

(२) असल्यास, अनुसूचित जमाती विशेषत: टोकरे कोळी व ठाकूर जातीचे जात पडताळणी प्रमाणपत्र आर्थिक मागणी पूर्ण न केल्याने क्षुल्लक सबबीखाली सह आयुक्तांकडून नाकारले जाते, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत तसेच टोकरे कोळी व ठाकूर जातीच्या व्यक्तींना तातडीने जात प्रमाणपत्र उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. विष्णु सवरा (०५-०१-२०१७) :**(१) नाही.

(२) नाही. महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग जातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम २००० (२००१ चा महाराष्ट्र क्र.२३) व महाराष्ट्र अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम, २००३ मधील तरतुदी/नियमानुसार जात वैधता प्रमाणपत्र देण्याचे कामकाज पडताळणी समितीमार्फत करण्यात येते. त्यानुसार प्रत्येक प्रकरणी किमान ०३ सदस्यांच्या गणपुर्तीशिवाय समितीस निर्णय घेता येत नसल्याने सह आयुक्तांना एकतर्फी निर्णय घेण्याची कायद्याने मुभा नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) उपरोक्त नमूद अधिनियम/नियमातील तरतुदीनुसार व अर्जदाराने सादर केलेली कागदपत्रे व पुरावे तसेच आवश्यकतेनुसार समितीने दक्षता पथकामार्फत केलेल्या तपासणीच्या आधारे समिती गुणावगुणानुसार निर्णय घेते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**यवतमाळ, अमरावती, अचलपूर बैतुल व चांदूरबाजार या राष्ट्रीय महामार्गाच्या निर्मितीबाबत**

**(३२) ६३७७३ (३०-०८-२०१६). डॉ.अनिल बोंडे (मोर्शी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती व बैतुल या १२६ किलोमीटर मार्गावरील अडगाव ते आठनेर हा ६० कि.मी. रस्ता एकपदरी असल्यामुळे वाहतुकीमध्ये अडथळा निर्माण होत असल्याने हा ६० किमी मार्ग दुपदरी करण्यात याव अशी मागणी सदर लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे दिनांक २५ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली आहे, वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-१०-२०१६) :**(१) प्रस्तुत प्रकरणी लोकप्रतिनिधी यांनी मा.मंत्री (सा.बां.) यांना दिनांक २५.१२.२०१५ रोजी पाठविलेले निवेदन प्राप्त झाले आहे.

(२) व (३) अडगाव ते आठनेर या ६० कि.मी. लांबीपैकी अडगाव ते गणेशपूर पर्यंत ३०.८०० कि.मी. लांबीचा रस्ता अमरावती जिल्ह्यामधील असून गणेशपूर गावानंतर आठनेर (जिल्हा बैतुल) पर्यंत रस्ता मध्यप्रदेश प्रांतातून जातो.

अडगाव ते गणेशपूर पर्यंत ३०.८०० कि.मी. लांबीचा रस्ता दुपदरी करणेबाबतचे काम निकष, मंजूरी व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून हाती घेण्याचे नियोजन आहे.

---

**आदिवासी विकास महामंडळाने शेकडो क्विंटल धान खराब झाल्याबाबत**

**(३३) ६५०७२ (१५-१२-२०१६). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्हयातील कोरची तालुक्यात आदिवासी महामंडळातर्फे खरेदी करण्यात आलेला तब्बल ८९८ क्विंटल तांदूळ खराब झाल्यामुळे फेकून देण्यात आल्याचे माहे ऑगस्ट ते सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासी विकास महामंडळाचे प्रादेशिक व्यवस्थापक गडचिरोली व उपप्रादेशिक व्यवस्थापक कोरची यांनी जिल्हाधिकाऱ्यांची परवानगी न घेता ८९८.४८ क्विंटल धान फेकुन दिल्याचा प्रकार घडला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी दोषी अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच धान सुरक्षित ठेवण्यासाठी लाखो रूपयांची ताडपत्री खरेदी केली जात असून खरेदी केलेल्या धान्याची देखभाल करण्यासाठी क्विंटल मागे दर महिन्याला संबधित संस्थेला रक्कम दिली जात असतांनाही खरेदी केलेले धान वर्षभरात खराब झाले असल्याने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (२५-०१-२०१७) :** (१) व (२) हे खरे नाही. मौजे कोरची जि.गडचिरोली येथील आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्था बेडगांव या केंद्रावर खरीप हंगाम २०१४-१५ मध्ये २७१५.२० क्विंटल धानाची खरेदी करण्यात आली होती पैकी १८१६.७२ क्विंटल धान भरडाईसाठी राईस मिलर्सकडे देण्यात आला. उर्वरित ८९८.४८ क्विंटल धान संस्थेकडे शिल्लक राहिला. संस्थेकडे गोदाम नसल्यामुळे ताडपत्रीने झाकून ठेवण्यात आला होता. परंतु झालेल्या अतिवृष्टीमुळे धान खराब झाले. त्यापैकी प्रत्यक्ष शिल्लक असलेला २२० क्विंटल धानांची रिबॅगिंग करण्यात आली तर उर्वरित ६७८.४८ क्विंटल धान ही घट आहे. रिबॅगिंग केलेल्या धानाची ई-लिलावामध्ये विक्री करण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी कार्यालयाकडुन सुरु आहे. प्रत्यक्ष आलेली घट ६७८.४८ क्विंटल बद्दल संस्थेकडुन विहित दरानुसार वसुली करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) हंगाम २०१४-१५ मधील धान ई-लिलावाव्दारे २२०.०० क्विंटल रिबॅगिंग केलेल्या धानाची ई-लिलावाव्दारे विक्रीची कार्यवाही सुरु आहे. उर्वरित ६७८.४८ क्विंटल धान घट धरुन संबंधीत संस्थेकडून शासनाने ठरवलेल्या दराप्रमाणे वसुल करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आदिवासी समाजाच्या विकासासाठी राबविण्यात येत असलेल्या विविध योजनांमधील गैरव्यवहाराची चौकशी अहवाल सादर केला नसल्याबाबत**

**(३४) ६५२६५ (१६-१२-२०१६). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी समाजाच्या विकासासाठी राबविण्यात येत असलेल्या विविध योजनांमधील गैरव्यवहाराची चौकशी करणा-या निवृत्त न्यायमुर्तींच्या अध्यक्षतेखालील समितीवर गेल्या दोन वर्षांपासून सुमारे तीन कोटी खर्च करुन ही या समितीने शासनाकडे अहवाल सादर केला नसल्याची माहिती माहे ऑक्टोबर-२०१६ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या समितीला सहा महिन्यांच्या आत अहवाल सादर करण्यास सांगण्यात आले होते परंतू गेल्या दोन वर्षात पाच वेळा मुदतवाढ देऊन करोडो रुपये खर्च करुनही चौकशी समितीचे काहीच काम झाले नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रश्नाबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदरील प्रकरणातील दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

(४) नसल्यास, त्यामागील कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०४-०२-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे. परंतु सदर समितीवर तीन कोटी खर्च झालेला नसून माहे ऑक्टोबर, २०१६ अखेर रु.१,९३,५७,३३३/- इतका खर्च झालेला आहे.

(२) होय, हे खरे आहे. चौकशी समितीला या प्रकरणातील सर्व व्यक्ती / दावेदार यांना समन्स काढून त्यांच्या साक्षी नोंदविणे, उलट तपासणी घेणे, इत्यादी कामाकरीता तसेच जनहित याचिका क्र.१५३/२०१२ मध्ये याचिकाकर्त्यांने केलेल्या आरोपाची शहानिशा करण्याकरीता प्रत्यक्ष स्थळ/कार्यालये यांची पहाणी करुन वस्तुस्थिती जाणून घ्यावी लागत असल्यामुळे या सर्व कामकाजासाठी विहीत कालावधीत पर्याप्त नसल्याने वारंवार मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

(३) शासन निर्णय दि. २६.९.२०१६ च्या शासन निर्णयाद्वारे दि.१७.७.२०१६ च्या पुढील सहा महिन्याच्या कालावधीकरीता सदर कालावधीनंतर यापुढे मुदतवाढ देण्यात येणार नाही या अटीवर अंतिम मुदतवाढ देण्यात आलेली आहे. सध्या चौकशी समितीचे कामकाज अंतिम

टप्यात असून, समितीने सदर अहवाल शासनास सादर केल्यानंतर अहवालानुसार सुचविलेल्या शिफारशी विचारात घेऊन न्यायालयाच्या निर्णयानुसार शासन स्तरावरुन पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यामध्ये आदिवासी आश्रमशाळांमध्ये विविध कारणांनी विद्यार्थ्यांचा मृत्यू झाल्याबाबत**

**(३५) ६५८१९ (१६-१२-२०१६). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.विलासराव जगताप (जत), श्री.एकनाथराव खडसे (मुक्ताईनगर), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.प्रशांत बंब (गंगापूर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.राजन साळवी (राजापूर), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.बसवराज पाटील (औसा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यामध्ये गेल्या १० वर्षात १९ आदिवासी आश्रमशाळांमध्ये विविध कारणांनी १०७७ आदिवासी विद्यार्थ्यांचा मृत्यू झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच डॉ. सुभाष साळुंखे यांच्या अध्यक्षतेखालील तज्ञ समितीने गेल्या १० वर्षातील मृत्यूचा अभ्यास करून राज्यपालांना अहवाल सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त अहवालातील शिफारशींमध्ये विद्यार्थीनीचे लैंगीक शोषण मोठया प्रमाणात होत असल्याने महिला पोलीस अधिकाऱ्यांनी आश्रमशाळेत भेटी देवून विद्यार्थीनींच्या समस्या समजुन त्यावर उपाययोजना कराव्यात असेही सुचविले आहे हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, आदिवासी आश्रमशाळांतील विद्यार्थ्यांचे लैंगीक शोषण व मृत्यूची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, सदर घटनांसाठी जबाबदार संबधितांवर शासन काय कारवाई करणार आहे,

(५) तसेच उक्त अहवालाची दखल घेऊन आश्रमशाळांची गुणवत्ता वाढवून विद्यार्थ्यांचे आरोग्य सुधारण्याबाबत शासन तातडीने काय उपाययोजना करणार आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१०-०२-२०१७) :** (१), (२), (३), (४), (५) व (६) राज्यातील आदिवासी विकास विभागांतर्गत शासकीय व अनुदानित आश्रमशाळांमध्ये सन २००१-०२ ते सन २०१५-१६ या कालावधीत १०७७ विद्यार्थ्यांचा विविध कारणांनी मृत्यू झाल्याची बाब निदर्शनास आलेली आहे. शासकीय आश्रमशाळांमध्ये झालेल्या विद्यार्थी मृत्यूचा अभ्यास करण्यासाठी व त्यावर

उपाययोजना सुचविण्यासाठी डॉ. सुभाष साळूंखे सेवानिवृत्त महासंचालक, आरोग्य सेवा यांच्या अध्यक्षतेखाली तांत्रिक समितीची स्थापना शासन निर्णय दिनांक ३०.५.२०१६ अन्वये करण्यात आली. सदर समितीने स्थानिक स्तरावर दौरे करुन तसेच बैठका घेवून आपला अंतिम अहवाल मा.राज्यपाल महोदयांना दिनांक १९.१०.२०१६ रोजी सादर केला आहे. सदर अहवालात विद्यार्थी मृत्यू रोखण्यासाठी तात्काळ करावयाच्या उपाययोजना तसेच दिर्घकालीन करावयाच्या उपाययोजना सुचविण्यात आल्या आहेत.सदर शिफारशी नुसार अंमलबजावणी करण्यात येत आहे.

सदर अहवालातील शिफारस व पाळा आश्रमशाळेतील घटना लक्षात घेवून आश्रमशाळेतील विद्यार्थीनींवरील लैंगिक अत्याचाराच्या घटनांना आळा घालण्यासाठी शासनाने तातडीने कार्यवाही करुन जिल्हाधिकारी यांच्या स्तरावर महिला अधिका-यांना तपासणी समित्या स्थापन करुन सदर समित्यांमार्फत शाळांची तपासणी करण्याच्या सूचना दि.०५.११.२०१६ रोजीच्या परीपत्रकान्वये देण्यात आलेल्या आहेत. महिला अधिकारी समित्यांमार्फत आश्रमशाळा तपासणी करण्यात आली आहे. तसेच सदर परिपत्रकान्वये स्थापन केलेल्या समित्या कायमस्वरुपी कार्यरत राहण्यासंदर्भात दि.१८.११.२०१६ रोजी शासन आदेश निर्गमित करण्यात आला आहे.

---

**डोलवली-माणकाली (ता.खालापूर,जि.रायगड) येथील आश्रमशाळेच्या जाचाला कंटाळून विद्यार्थ्याने केलेला आत्महत्येचा प्रयत्न**

**(३६) ६६०४७ (१६-१२-२०१६). श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोलवली-माणकाली (ता.खालापूर,जि.रायगड) येथील आश्रमशाळेत शिकणाऱ्या कु.सोमनाथ वाघमारे या विद्यार्थ्याने आत्महत्या करण्याचा प्रयत्न दिनांक १२ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, सदर चौकशीत काय निष्पन्न झाले आहे आणि सदर प्रकरणातील संबधित दोषी व्यक्तींवर शासनाकडून कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१०-०२-२०१७) :**(१), (२) व (३) शासकीय आश्रमशाळा डोलीवली, ता.खालापूर, जि.रायगड येथील इयत्ता ७ वी तील विद्यार्थी सोमनाथ परशुराम वाघमारे याचे दि. १२/१०/२०१६ रोजी शाळेतील इतर २ विद्यार्थ्यांशी भांडण झाल्याने तो शाळेतून विनापरवानगी पळुन गेला. सदर विद्यार्थी डोलीवली रेल्वे स्थानकातून लोकलने प्रवास करत असतांना त्याची गोंधळलेली परिस्थिती बघुन इतर प्रवाश्यांनी त्याची चौकशी केली असता त्याने रेल्वेतून उतरुन पळून जाण्याचा प्रयत्न केला त्यामुळे त्याला इतर प्रवाश्यांनी रेल्वे पोलिसांच्या ताब्यात दिले. सद्यस्थितीत सदर विद्यार्थी सुखरुप असुन त्याने आत्महत्येचा प्रयत्न केलेला नाही. सदर विद्यार्थी शाळेत शिक्षण घेत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आदिवासी विकास विभागाच्या कार्यालयात अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या**
**६६ पदांपैकी ३२ पदे रिक्त असल्याबाबत**

**(३७) ६६०६१ (१६-१२-२०१६). श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यामध्ये एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, शहापूर या आदिवासी विकास प्रकल्प कार्यालया अंतर्गत जिल्ह्यातील शहापूर, मुरबाड, भिवंडी, कल्याण, ठाणेसह अनेक शहरे व गावे येत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या आदिवासी विकास विभागाच्या कार्यालयाकडून दरवर्षी येणाऱ्या करोडो रुपयांच्या योजना यशस्वीपणे राबविण्याकरिता अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या ६६ पदांपैकी ३२ पदे रिक्त असल्याची बाब माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्या सुमारास उघडकीस आली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यामुळे शासनाच्या कल्याणकारी योजना आदिवासी जनतेपर्यंत पोहचण्यास विलंब होत असून रिक्त पदे त्वरीत भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०४-०२-२०१७) :**(१) एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, शहापूर अंतर्गत शहापूर, मुरबाड, भिवंडी, ठाणे, कल्याण, उल्हासनगर व अंबरनाथ या तालुक्यांचा समावेश होतो.

(२) व (३) प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प शहापूर कार्यालयामधील अधिकारी व कर्मचा-यांच्या ६६ पदांपैकी ३० पदे सद्यस्थितीत रिक्त आहेत.

शहापूर प्रकल्प कार्यालयाकडे उपलब्ध असलेल्या कर्मचा-यांकडे अतिरिक्त कार्यभार देवून कामकाज करण्यात येत असल्याने शासनाच्या कल्याकारी योजना आदिवासी जनतेपर्यंत पोहचण्यास विलंब झालेला नाही.

तसेच, गट-ब व गट-क संवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबत अनुक्रमे आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक व अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे यांच्या स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**हिंगोली जिल्हयातील आदिवासी घरकूल योजनांतर्गत घरे देण्याबाबत**

**(३८) ६६१६७ (१६-१२-२०१६). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्हयात १ लाखापेक्षा जास्त आदिवासी असून सुध्दा शबरी आदिवासी घरकूल योजनांतर्गत केवळ २२७ घरकुलांना मंजूरी दिल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास, आली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या जिल्हयात मोठया प्रमाणात आदिवासी लाभार्थी हक्काच्या घरांच्या प्रतिक्षेत आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, हिंगोली जिल्हयातील प्रतिक्षेत असलेल्या आदिवासींना शबरी आदिवासी घरकुल योजनेतंर्गत घरे देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०४-०३-२०१७) :** (१) होय
(२) होय
(३) हिंगोली जिल्हयाकरीता सन २०१५-१६ व सन २०१६-१७ करीता प्राप्त उदिष्टानुसार २२७ पात्र लाभार्थ्यांच्या घरकुलास अध्यक्ष जिल्हा स्तरीय समिती तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली यांनी प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे. तसेच आदिवासी लाभार्थ्यांना प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामिण अंतर्गत सुदधा घरकुलांचा लाभ देण्यात येत असतो. हिंगोली जिल्हयात सन २०१६-१७ मध्ये एकुण ६०८ आदिवासी लाभार्थ्यांना या योजनेंतर्गत घरकुले मंजुर करण्यात आलेली आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पनवेल (जि. रायगड) येथील आदिवासी महिलासाठी राबविण्यात आलेल्या शिलाई मशिन व प्रशिक्षण योजनेत झालेल्या गैरव्यवहाराच्या कारवाईबाबत**

**(३९) ६६८५४ (१६-१२-२०१६). श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पनवेल (जि. रायगड) येथील आदिवासी महिलासाठी राबविण्यात आलेल्या शिलाई मशिन व प्रशिक्षण योजनेत झालेल्या गैरव्यवहाराबाबत संबंधित संस्थेविरुद्ध पनवेल पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल केला आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर गुन्ह्याच्या अनुषंगाने चौकशी करून गैरव्यवहार करणाऱ्या संस्थेचे पदाधिकारी आणि गैरव्यवहारात सामील आदिवासी विभागाचे अधिकारी/ कर्मचारी याचे विरुध्द न्यायालयात आरोपपत्र दाखल करण्यात आले काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०४-०३-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) होय. दिनांक ०१/०७/२०१६ रोजी एफ.आय.आर.क्र.सीआर नं.१२२, दिनांक ०१/०७/२०१६ रोजी खांदा कॉलनी पोलीस स्टेशन, नविन पनवेल येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा तपास अद्याप चालु असून सद्य:स्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्य उत्पादन शुल्क विभागाने बनावट विदेशी मद्य आणि हातभट्टी दारु उत्पादन प्रकरणी जप्त मालमत्ता बेवारसपणे पडून असल्याबाबत**

**(४०) ६७०१८ (१६-१२-२०१६). श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या महसूल वाढीत महत्वाची भुमिका बजावणाऱ्या उत्पादन शुल्क विभागाने बनावट विदेशी मद्य आणि हातभट्टी दारु उत्पादनाप्रकरणी सुमारे ४२ हजार ३२९ जणांवर कारवाई केली असून या विभागाला २१ हजार २३७ गुन्ह्यांचा तपास लागलेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील गुन्ह्यात जप्त केलेली सुमारे ५२ कोटी रुपयांची मालमत्ता बेवारसपणे पडून असल्याची माहिती माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग १ व २ बाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती सदरील प्रकरणी दोषींविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२४-०१-२०१७) :**(१) अंशत: खरे आहे.

राज्य उत्पादन शुल्क विभागाने माहे एप्रिल, २०१४ ते मार्च, २०१५ या कालावधीत एकूण ४२,३२९ गुन्हे नोंद केलेले आहेत. त्यापैकी एकूण २१,०९२ वारस गुन्ह्यांत २१,४६१ इसमांना अटक करण्यात आलेली आहे. तर उर्वरित २१,२३७ गुन्हे बेवारस आहेत.

(२) हे खरे नाही. राज्यात विभागामार्फत एप्रिल, २०१४ ते मार्च, २०१५ या कालावधीत जप्त केलेल्या मुद्देमालाची एकूण किंमत रु.७२.६८ कोटी व एप्रिल, २०१३ ते मार्च, २०१४ या कालावधीत जत्प केलेल्या मुद्देमालाची एकूण किंमत रु.५२.३७ कोटी इतकी आहे.

(३) हातभट्टी दारु निर्मितीसाठी तयार केलेले रसायन व हातभट्टीची दारु जागीच नष्ट केले जाते. तसेच वारस गुन्ह्यात मा.न्यायालयाच्या निर्णयाच्या परवानगी अंती जप्त देशी/विदेशी मद्य, बियर इ.नाश करण्यात येते. त्याचप्रमाणे मा.न्यायालयांच्या निर्णयानंतर जर वाहन शासन जमा करण्याचे आदेश झाले तर लिलावाव्दारे विक्री केली जाते. ही कार्यवाही वेळोवेळी व नियमानुसार केली जाते.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोळघर (ता.अलिबाग) येथील आश्रमशाळेच्या दुरावस्थेबाबत**

**(४१) ६७१३९ (१६-१२-२०१६). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोळघर (ता.अलिबाग) येथील आश्रमशाळेची दुरवस्था झाली असून मुलभूत सोयी-सुविधा नसल्याने विद्यार्थ्यांना अनेक गैरसोयींना तोंड द्यावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी करुन पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०२-०३-२०१७) :** (१) हे खरे नाही.

सादर आश्रमशाळेमध्ये २५३ मुले व २५७ मुली असे एकूण ५१० विद्यार्थी निवासी राहून शिक्षण घेत असून आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांसाठी जुन्या इमारतीत एकूण १० वर्गखोल्या, १ कार्यालय, मुलांकरीता १० व मुलींकरिता १० असे एकूण २० स्नानगृहे आहेत. तसेच मुलांकरीता १० व मुलींकरिता १० असे एकूण २० शौचालये उपलब्ध आहेत. सदर आश्रमशाळेत १ विज्ञान प्रयोगशाळा, १ वाचनालय, १ बहुउद्देशिय हॉल, व्यायामशाळेच्या मालकीच्या विहिरव्दारे नळ पाणीपुरवठा केला जातो. पाण्याच्या साठवणुकीसाठी १० हजार लिटर क्षमतेची पाण्याची टाकी उपलब्ध आहे. तसेच आश्रमशाळेसाठी क्रिडांगण आहे.

नवीन इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले असून किरकोळ कामे प्रलंबित असल्याने इमारत हस्तांतरीत करुन घेता आलेली नाही. सदर कामे पुर्ण झाल्यावर इमारत ताब्यात घेण्यात येईल.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शहापूर आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत असलेल्या मुरबाड तालुक्यातील माळ आश्रमशाळेतील २३ विद्यार्थ्यांना अन्नातून झालेली विषबाधा**

**(४२) ६७२३४ (१६-१२-२०१६). श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत असलेल्या मुरबाड तालुक्यातील माळ आश्रमशाळेतील २३ विद्यार्थ्यांना दिनांक १५ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास अन्नातून विषबाधा झाल्याची घटना निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आश्रमशाळेत विद्यार्थ्यांना शिळे अन्न दिल्याने विषबाधा झाली असून टोकावडे व शिरोशी या आरोग्य केंद्रात विद्यार्थ्यांना दाखल केल्यानंतर या विद्यार्थ्यांपैकी ८ ते १० विद्यार्थ्यांना टायफाईड झाल्याचे तपासात निष्पन्न झाले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर विषबाधा होण्याची कारणे काय आहेत व त्यास जबाबदार असलेल्या संबंधित शासकिय कर्मचारी तसेच अधिकाऱ्याविरोधात शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे.

(४) तसेच या आश्रमशाळेत गेल्या पाच वर्षाहून अधिक काळ अधिक्षिकेची जागा रिक्त असून सदर पद इतके वर्ष रिक्त राहण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०८-०३-२०१७) :**(१), (२) व (३) शासकीय आश्रमशाळा माळ येथील १९ विद्यार्थ्यांना दि.१५.१०.२०१६ रोजी संध्याकाळच्या जेवणानंतर मळमळणे डोके दुखणे, पोट दुखणे इत्यादी त्रास झाल्याने ग्रामीण रुग्णालय टोकावडे, येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. तदनंतर दि.१६/१०/२०१६ रोजी आणखी ४ विद्यार्थ्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्यापैकी ७ विद्यार्थ्यांना टायफाईड झाल्याचे निदान चाचण्यांमधून दि.१७.१०.२०१६ रोजी झाले. विद्यार्थ्यांना झालेल्या त्रासाच्या कारणांचा शोध घेण्यासाठी दि.१५/१०/२०१६ रोजीच्या संध्याकाळच्या जेवणाचे नमुने उपसंचालक, आरोग्य सेवा, प्रयोगशाळा पुणे यांच्याकडून तपासून घेण्यात आले आहेत त्यांच्या दि.३.११.२०१६ रोजीच्या अहवालानुसार अन्नात विषजन्य घटक आढळून आलेले नाहीत.

सदर प्रकरणी शाळेचे अधिक्षक यांना दि.१६.११.२०१६ रोजी निलंबीत करण्यात आले आहे व मुख्याध्यापक यांना करणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.

(४) अप्पर आयुक्त, ठाणे यांच्या अधिनस्त वर्ग-क संवर्गातील भरतीसाठी दि.५.७.२०१४ रोजी परिक्षा घेण्यात आली तथापि सदर परिक्षेत स्त्री अधिक्षिका संवर्गात गुणवत्ता प्राप्त उमेदवार प्राप्त न झाल्याने पदे रिक्त राहिली आहेत. सद्यस्थितीत अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे यांच्या अधिनस्त अधिक्षक (पुरुष), अधिक्षक (महिला), गृहपाल (पुरुष) व गृहपाल (महिला) यांची काही पदे भरण्यास मान्यता देण्यात आली असून त्यानुसार पदभरती करण्याची कार्यवाही अपर आयुक्त, आदिवासी विकास ठाणे यांच्या स्तरावरुन करण्यात येत आहे.

---

**आदिवासी शेतकरी, देवस्थान शेतकरी व जंगल निवासी जनतेचे मागण्यांबाबत**

**(४३) ६७६२६ (११-०१-२०१७). अॅड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी शेतकरी, देवस्थान शेतकरी व जंगल निवासी जनतेचे प्रश्न लवकरात लवकर सोडविण्यात यावे याकरिता दिनांक ३ ऑक्टोबर, २०१६ मा.आदिवासी विकास मंत्री यांच्या वाडा (जि.पालघर) येथील निवासस्थानी ५० हजारांच्यावर आदिवासी शेतकरी, देवस्थान शेतकरी व जंगल निवासी यांनी घेराव घातला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मोर्चेकरांच्या मागण्यांचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, उक्त मागण्यांच्या पुतर्तेसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०५-०२-२०१७) :** (१) होय.

(२) व (३) मोर्चेकऱ्यांच्या मागण्या वनाधिकार कायद्याची लोकाभिमुख अंमलबजावणी पडकई विकास योजना, कुपोषण व बालमृत्यु रोखणे इ. बाबतच्या आहेत.सदर मागण्यांच्या अनुषंगाने मा.मंत्री (आ.वि.) यांच्या अध्यक्षतेखाली दि.७/१०/२०१६ रोजी बैठक आयोजित करण्यात आलेली होती. या बैठकीतील निर्णयानुसार खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे.

शासन परिपत्रक दि.११/११/२०१६ अन्वये वनहक्क कायद्यांतर्गत तरतुदींचे काटेकोरपणे पालन करण्याच्या सुस्पष्ट सूचना देण्यात आलेल्या आहेत.

पडकई विकास योजनेतंर्गत जमीन सपाटीकरणाची कामे केलेल्या आदिवासी शेतकऱ्यांना कामाची रक्कम अदा करणेसाठी निधी मंजुर करण्यात आलेला आहे.

भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम अमृत आहार योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी गॅस शेगडया, सिलेंडर्स, एक महिला स्वयंपाकी उपलब्ध करुन देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

वसतीगृहातील विद्यार्थ्यांना सोयीसुविधा व निर्वाहभत्ता देणेबाबत प्रकल्प अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आलेल्या असून अन्य मागण्यांबाबत सदर बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार उचित कार्यवाही करण्याच्या सूचना शासन पत्र दि.५/११/२०१६ अन्वये सर्व संबंधितांना देण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आदिवासी सहकारी संस्था, गोर्र (जि.गोंदिया) येथील संस्थेने गैरव्यवहार केल्याबाबत**

**(४४) ७०२७९ (२७-०१-२०१७). श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी सहकारी संस्था, गोर्र (जि. गोंदिया) येथील संस्थेने सन २०१५-१६ या वर्षामध्ये गहाण खरेदीमध्ये ९,६३,०००/- रक्कमेचा गैरव्यवहार केल्याबाबत आमगांव मतदार संघातील लोकप्रतिनिधींनी मा. मंत्री (आदिवासी विकास) यांच्याकडे दिनांक ५ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदन दिले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गैरव्यवहार केलेली रक्कम आदिवासी महामंडळ देवरी (उपप्रदेश) येथे परत करण्याबाबत पोलीस ठाण्यात एफ.आय.आर. दाखल करण्यात येऊनही अद्याप कोणतीच कारवाई करण्यात आलेली नाही हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर दोषी आढळलेल्या संबंधितांची चौकशी करून कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०४-०३-२०१७) :** (१) होय.

(२) व (३) हे खरे नाही.

खरेदी केंद्रावरील धानाचे ९०७ पोते याचे वजन २८३.६० क्विंटल याचे अफरातफर प्रकरणी आदिवासी सहकारी संस्था, गोर्रे, जि.गोंदिया या संस्थेवर कारवाई करण्यासाठी उप प्रादेशिक व्यवस्थापक, देवरी यांनी दि.०९.११.२०१६ च्या पत्रान्वये तालुका पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन सालेकसा यांचेकडे तक्रार दाखल केली. या प्रकरणी एफआयआर दाखल करण्यापुर्वी चौकशीची कारवाई चालु असतांना संस्थेचे सचिव व अध्यक्ष यांनी रु.९,००,१८२/-

लक्ष रकमेचा दंडासह भरणा उपप्रादेशिक कार्यालय,देवरी यांचेकडे केलेला आहे. सदर भरणा दंडात्मक रकमेसह भरुन घेतला आहे व सन २०१६-१७ च्या हंगामाकरीता या संस्थेस हमीभाव धान खरेदीचे काम देण्यात आलेले नाही. परंतु शेतकऱ्यांच्या हितासाठी या हंगामाचे हमीभावाचे धान खरेदीचे काम लगतच्या आदिवासी विविध कार्यकारी संस्था, सालेकसा यांना संबंधित क्षेत्र जोडून दिले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**आदिवासी विकास महामंडळात झालेल्या नोकर भरती गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत**

**(४५) ७०५७६ (२७-०१-२०१७). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आदिवासी विकास महामंडळात झालेल्या नोकर भरतीत तीनशे कोटींचा गैरव्यवहार झाल्याचा आरोप लोकप्रतिनिधीनी मुख्यमंत्री यांच्याकडे करताच मा.मुख्यमंत्र्यानी चौकशीचे आदेश दिल्यामूळे मा.आदिवासी विकास मंत्र्यानी या गैरव्यवहार प्रकरणी महामंडळाचे महाव्यवस्थापकासह तीन अधिका-यांना माहे जून, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निलंबित केले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासर्व अधिका-यांना चौकशीपूर्वीच पुन्हा सेवेत घेण्याची प्रक्रिया सुरु झाली आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीअंती त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०२-०३-२०१७) :** (१) आदिवासी विकास महामंडळातील नोकर भरतीमध्ये झालेल्या गैरव्यवहाराच्या अनुषंगाने, विभागीय आयुक्त, नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली उच्च स्तरीय समितीमार्फत सखोल चौकशीचे आदेश देण्यात आले आहेत. मात्र, प्रस्तुत गैरव्यवहाराच्या अनुषंगाने निलंबनाची कार्यवाही करण्यात आलेली नाही.
(२) या प्रकरणात निलंबन करण्यात आले नसल्यामुळे पुन्हा सेवेत घेण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(३), (४) व (५) प्रस्तुत प्रकरणी मा. विभागीय आयुक्त, नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समितीमार्फत सखोल चौकशीचे आदेश देण्यात आले होते. सद्य:स्थितीत प्रस्तुत चौकशी अहवालाची तपासणी विभागाच्या स्तरावर सुरु असून, सदर अहवाल लवकरात लवकर शासनास निर्णयार्थ सादर करण्यात येत आहे.

---

**राष्ट्रीय अनुसूचित जमाती वित्त व विकास विभागाने पतपुरवठा बंद केल्याबाबत**

**(४६) ७०७९६ (२७-०१-२०१७). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासी समाजातील युवकांना आर्थिकदृष्टया सक्षम करण्यासाठी शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाच्या माध्यमातून व राष्ट्रीयकृत बँकेच्या सहकार्यातून अतिशय अल्प व्याजदराने पाच लाखापर्यंत कर्ज देण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेतील लाभार्थ्यांकडे २३ कोटीहून अधिकची थकबाकी असून यासाठी शासनाकडून हमी मिळत नसल्याने गेल्या दोन वर्षांपासून राष्ट्रीय अनुसूचित जमाती वित्त व विकास विभागाने पतपुरवठा बंद केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पतपुरवठा बंद केल्याने राज्यातील हजारो सुशिक्षित युवक या योजनेपासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, बंद केलेल्या पतपुरवठा तातडीने सुरु करण्यासाठी शासनामार्फत कोणत्या उपाययोजना केल्या आहेत व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. विष्णु सवरा (२७-०२-२०१७) :** (१) (२) व (३) होय, हे खरे आहे.

(४) शासन हमी प्राप्त करण्यासाठी वित्त विभागास प्रस्ताव सादर करण्यात आला असता काही बाबींची पुर्तता करण्याच्या सूचना प्राप्त झालेल्या आहेत.त्याची पुर्तता झाल्यावर वित्त विभागास फेरप्रस्ताव सादर करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

---

**पालघर जिल्ह्यातील आदिवासी ग्रामीण तालुक्यांमध्ये आदिवासीचे खावटी कर्ज योजना सुरु करण्याबाबत**

**(४७) ७०८८९ (११-०१-२०१७). श्री.पास्कल धनारे (डहाणू), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील आदिवासी ग्रामीण तालुक्यांमध्ये आदिवासींसाठी सन २०१४ पासून खावटी कर्ज योजना सुरु होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पालघर जिल्हयातील वाडा, विक्रमगड, तलासरी, जव्हार, मोखाडा, वसई इत्यादी ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात आदिवासी शेतमजुरांची संख्या वाढत असून बंद करण्यात आलेली खवटी धान्यवाटप कर्ज योजना पुन्हा नव्याने सुरु करण्याची मागणी स्थानिक आदिवासीबांधवांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त बाब क्र.१ व २ नुसार चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सदर योजना तात्काळ सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०१-०३-२०१७) :** (१) सदर योजना सन २०१४ पासुन सुरु नसून सन २००८-०९ ते सन २०१३-१४ पर्यंत योजना सुरु होती.
(२) व (३) या संदर्भातील प्रस्ताव प्राप्त झाला असून सदर प्रस्ताव तपासण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरु आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**यवतमाळ जिल्हयातील आदिवासी विकासाचा निधी अखर्चीत असल्याबाबत**

**(४८) ७२६१४ (११-०१-२०१७). डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आदिवासी बहुल यवतमाळ जिल्हयातील आदिवासी विकासाच्या वैयक्तीक लाभ व समुह लाभाच्या योजनासाठी जिल्हानियोजन समितीकडून मोठया प्रमाणावर निधी उपलब्ध असुन हा निधी अखर्चीत असल्याचे दि. २८ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय
(२) असल्यास, सदर आदिवासी वैयक्तिक व समुह लाभ योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्याकरीता संबंधित विभागास आदेशित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०७-०३-२०१७) :** (१) व (२) होय, हे अंशत: खरे आहे.
जिल्हा नियोजन समितीची बैठक दि.२६.०९.२०१६ रोजी पार पडल्यानंतरच नवीन कामांना प्रशासकीय मान्यता व निधी वितरण करण्यात आलेले आहे. तत्पूर्वी फक्त महत्वाच्या योजनांनाच निधी वितरीत करण्यात आल्यामुळे वितरीत तरतूदीशी खर्चाची टक्केवारी जानेवारी, २०१७ अखेर ५७.३३% इतकी आहे.

उपरोक्त निधीच्या संदर्भात जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली दि.२५.०१.२०१७ रोजी बैठक होऊन सर्व यंत्रणांना निधी खर्च करण्याकरिता तसेच उर्वरीत निधी मागणीबाबतचे नियोजन करण्याकरीता निर्देश देण्यात आलेले आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गडचिरोली जिल्ह्यातील मागील सात वर्षापासून बंद असलेले धान खरेदी केंद्र सुरू करण्याबाबत**

**(४९) ७३०६२ (११-०१-२०१७). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विविध कार्यकारी संस्थेद्वारा गडचिरोली जिल्ह्यात अनेक ठिकाणी धान खरेदी केंद्र सुरू करण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनेक केंद्रे मागील अनेक वर्षापासून बंद आहेत हे खरे आहे काय,

(३) असल्यास, आरमोरी तालुक्यातील विहीरगाव येथील धान खरेदी केंद्र मागील सात वर्षापासून बंद आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास ,चौकशीअंती अनेक वर्षापासून बंद असलेली अनेक केंद्रे तसेच आरमोरी तालुक्यातील विहीरगाव येथील सात वर्षापासून बंद असलेले धान खरेदी केंद्र सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१०-०२-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) होय, हे अंशत: खरे आहे.

हंगाम २०००-०१ ते २००३-०४ पर्यंत विहीरगाव खरेदी केंद्रावर मोठया प्रमाणावर धानात घट आल्याने हंगाम २००४-०५ मध्ये आदिवासी विविध कार्यकारी संस्था विहीरगाव यांना खरेदी केंद्र मंजुर करण्यात आले नाही. परंतु शेतक-यांची गैरसोय होवू नये म्हणून हंगाम २००५-०६ ते २००९-१० पर्यंत पुन्हा संस्थेला खरेदी केंद्र मंजुर करण्यात आले. मात्र सदर कालावधीत देखील अवास्तव घट आल्याने हंगाम २०१०-११ ते २०१३-१४ पर्यंत संस्थेला खरेदी केंद्र मंजुर करण्यात आले नाही. हंगाम २०१४-१५ व २०१५-१६ मध्ये संस्थेला खरेदी केंद्र मंजुर करूनही संस्थेने खरेदी केंद्र सुरू केले नाही.

खरीप पणन हंगाम २०१६-१७ करीता खरेदी केंद्र मंजूर करुन सुरु करण्यात आले असुन, आदिवासी विविध कार्यकारी संस्था, विहीरगांव यांचे मार्फत खरेदी केंद्रावर दि.१७.०१.२०१७ अखेर आधारभुत योजनेंतर्गत १०७१.२९ क्विंटल आणि एकाधिकार खरेदी योजनेंतर्गत ६३९.४८ क्विंटल धानाची खरेदी करण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शासनाने ताडी व्यवसायिकांकरिता तालुक्यात १००० ताडीची झाडे असण्याबाबत घेतलेला निर्णय**

**(५०) ७३२१४ (१६-१२-२०१६). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या उत्पादन शुल्क विभागाने ताडी-माडीमध्ये होत असलेल्या भेसळीमुळे एका दुकानामागे तब्बल एक हजार ताड, माड आणि खजुराची झाडे असावीत, असे बंधनकारक केले असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सरकारच्या या निर्णयामुळे कोकणातील रत्नागिरी जिल्ह्यातील भंडारी समाजाच्या १८० ते २०० विक्रेत्यांचा ताडीमाडी विक्रीचा व्यवसाय धोक्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संदर्भात भंडारी समाजाच्या प्रतिनिधींनी राज्य उत्पादन शुल्क मंत्र्यांना माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये निवेदन देऊन सदरहू निर्णयाचा फेरविचार करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू मागणीवर शासनाने निर्णय घेतला आहे काय,

(५) असल्यास, निर्णयाअंती ताडीमाडी विक्री व्यवसायाला दिलासा देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०४-०२-२०१४) :** (१) होय. शासन निर्णय, दि.२८.१०.२०१६ अन्वये, सन २०१६-१७ या ताडी वर्षाकरीता ज्या तालुक्यात १००० परिपक्व ताडी झाडे आहेत त्याच तालुक्यात १००० झाडांमागे एका ताडी दुकान देता येईल व ताडी वृक्ष असलेल्या तालुक्यात कायम रहिवाशी व्यक्ती व तालुक्यातील सहकारी व भागीदारी नोंदणीकृत संस्थांमध्ये मर्यादित लिलाव करावा, असा निर्णय घेण्यात आला आहे.

(२) हे खरे नाही. प्रत्येक तालुक्यात किमान १००० परिपक्व ताडी झाडे विहीत केल्याने व तालुक्यातील कायम रहिवाशीच भाग घेऊ शकेल अशी अट विहीत केल्याने रत्नागिरी जिल्ह्यातील ताडी व्यावसायिकांनी ही अट शिथील करण्याकरीता मागणी केली.

(३) अंशत: खरे आहे. अध्यक्ष, सिंधुदूर्ग जिल्हा माडी विक्री व्याससायिक संघ यांनी मा.मंत्री, राज्य उत्पादन शुल्क यांना दि.८.११.२०१६ रोजी सादर केलेल्या निवेदनान्वये सदर निर्णयाचा फेरविचार करण्याची विनंती केली.

(४) व (५) होय, शासन निर्णय, दि.३०.११.२०१६ अन्वये ज्या जिल्ह्यात सर्व तालुक्यामध्ये किमान १००० परिपक्व झाडे आहेत, त्या जिल्ह्यातील कायम रहिवाशी असलेला बोलीधाकर त्याच जिल्ह्यातील कोणत्याही तालुक्याच्या ताडी दुकानासाठी जिलावात भाग घेवू शकेल, अशी सुधारणा करण्यात आल्याने विलंबाचा प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन**
**मुंबई**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.